E-file

**किरकोळ फौजदारी अर्ज नं- ४५९/२०२६** **निशाणी ०१ पुरवणी**

**साक्षीदाराचे सत्यापन**

**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो/करते की,**

**नाव :** अतुलसिंग दयालसिंग चंदानी,

**वय : ५५** वर्षे, **व्यवसाय :** व्यवसाय,

**रा. :** निगडी प्राधिकरण, पुणे

**शपथेवर सत्यापन –**

०१. चिखली येथील गट न.१५६३ या मिळकतीबाबत १९९० ते १९९८ या दरम्यान बेकायदेशीररित्या दगड व मुरुम यांचे उत्खनन सोनवणे व शेलार यांचे कुंटुंबीय करत होते. त्यांच्याविरुध्द महसुल विभागाने तहसीलदार यांनी ९०,००० ब्रासप्रमाणे उत्खनन केल्यामुळे २५,१६,८९६/- रुपये दंड आकारलेला होता आणि दि.३१/०७/१९९८ ही दंड भरण्याची शेवटची तारिख दिलेली होती. त्यांनी दंडाची रक्कम सदर तारखेपर्यंत भरली नाही म्हणून तहसीलदार यांनी नोटीस पाठवून सदर रकमेची मागणी केली होती. सन २००२ मध्ये तहसीलदार यांनी सदरची मिळकत लिलाव करुन दंडाची रक्कम वसूल करणेबाबतचा प्रस्ताव प्रांत यांना पाठवला. प्रांत यांनी डिसेंबर २००४ मध्ये लिलावसंदर्भात परवानगी दिली. दि.१४/०१/२००५ रोजी तहसीलदार यांनी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात दिली व लिलावाचा दिवस १४/०२/२००५ सकाळी ११.०० ठेवला. त्याप्रमाणे मी व माझ्या वडीलांनी सदर लिलावात सामिल झालो. त्यामध्ये माझ्या वडीलांनी सर्वात जास्त रकमेची बोली लावली. त्यांच्या नियमानुसार १५ दिवसांत आम्ही लिलावाची रक्कम रुपये २९,६०,०००/- भरली. त्यानंतर उपविभागीय अधिकारी यांनी दि.०४/०५/२००५ च्या आदेशानुसार सदर लिलावाला अंतिम मान्यता दिली आणि तहसीलदार यांना आदेश दिला की, माझ्या वडीलांना सदर मिळकतीचा ताबा आणि विक्री प्रमाणपत्र ९हे. ३३आर. एवढ्या मिळकतीची मोजणी करुन ताबा देण्यात यावा. तहसीलदार यांनी मंडल अधिकारी यांना जमिनीची पाहणी करुन उपविभागीय अधिकारी यांच्या आदेशाची पुर्तता करणेबाबत सांगितले. तसेच सदर क्षेत्रापैकी किती क्षेत्र सपाट आहे हे पाहण्याचे आदेश दिले होते. मंडल अधिकारी यांनी ९हेक्टर मिळकतीपैकी २हे. ७०आर मिळकत सपाट असलेबाबत रिपोर्ट दिला होता. मंडल अधिकारी यांनी तालुका निरिक्षक भूमी अभिलेख यांची मदत घेवून शासकिय मोजणी क्र.११/२००९ प्रमाणे २ हेक्टर मिळकतीची हद्द निश्चित करुन मोजणी नकाशा कायम केला. सदर मोजणी जून २००९ मध्ये करण्यात आली. दि.०६/०७/२००९ रोजी विक्री प्रमाणपत्र माझ्या वडीलांच्या नावे तहसीलदार यांनी जारी केले.

Bahadik
1-8-2026

**E-file**

त्याचा फेरफार क्र.१८२३८ दि.०९/०७/२००९ प्रमाणे महसूल येथे दफ्तरी नोंद करण्यात आली. त्याप्रमाणे माझ्या वडीलांचे नाव सदर मिळकतीच्या सातबारा रेकॉर्डसदरी लावण्यात आले. दि.३०/०९/२००९ रोजी सदर मिळकतीचा ताबा माझ्या वडीलांना मंडल अधिकारी यांनी पंचनामा करुन दिला. सोनवणे यांच्या हिश्याची १३३ गुंठे मिळकत घेतली होती त्यास सोनवणे यांनी संमती दिली होती, त्याबाबत वेगळा पंचनामा करण्यात आला व शेलार यांची ६७ गुंठे मिळकत पोलीस संरक्षण घेवून पंचनामा करुन त्याच दिवशी त्याचा ताबा देण्यात आला. सदर जागेचा ताबा घेतल्यानंतर त्याला कंपाऊंड केले.

**०२.** जून २०२५ मध्ये मी पाहणी करण्यासाठी सदर मिळकतीमध्ये गेलो असता शेलार याचे हिश्याची जी मिळकत माझ्या वडीलांनी घेतली होती त्या मिळकतीमध्ये अनाधिकृतपणे बांधकाम चालू होते. बांधकामाचे मोठ्या प्रमाणात साहित्य तेथे पडलेले होते, तसेच शेड बांधण्याचे साहित्यसुध्दा तेथे पडलेले होते, तसेच एका शेडचे बांधकाम पुर्ण झालेले होते व त्यामध्ये वृतिका नावाने व्यवसाय चालू होता. आजुबाजूच्या लोकांकडे मी विचारपूस केली असता ती वृतिका एलआयएस कंपनी मनोज आगरकर व लक्ष्मण आगरकर चालवत होते. त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी आम्हाला शेलार याने नोंदणीकृत करारनामा करुन सदरची मिळकत भाड्याने दिली आहे. शेडचे बांधकाम हे सुशील गुप्ता, बाबू शेख व मुंगसे असे करत असल्याचे समजले. सुशील गुप्ता यांचा मोबाईल क्रमांक मला आजूबाजूच्या लोकांकडून मिळाला, सदर क्रमांकावर मी फोन केला असता त्याने मला सांगितले की, शेलार यांच्याकडून मिळकत घेवून मी शेड बांधत आहे. गुप्ता याला मी मिळकतीचे आमच्याजवळील सर्व कागदपत्रे म्हणजेच लिलाव, विक्री प्रमाणपत्र, फेरफार इ. दाखवले. त्याने आम्हाला सांगितले की, मी जी वादाची मिळकत आहे ती खरेदी करुन ती कायदेशीर करण्याचे काम करतो. त्याने माझ्याकडे एक करोड रुपये खंडणी मागितली व तुम्ही ते पैसे मला दिले तर मी हे सर्व सोडून निघून जाईन असे म्हणाला. आगरकर याला मी शेड काढण्यासाठी सांगितले असता त्याने शेलार यांना बोलावून घेतले. त्यावेळी शेलार यांनी मला शिवीगाळ करुन धमकी दिली की, तुम्ही येथे आले तर याच खदानीत तुझा अंतिम कार्यक्रम करेन. त्यानंतर मी घाबरुन सदरची सर्व हकिकत माझ्या वडीलांना सांगितली. त्यानंतर दि.२७/०७/२०२५ रोजी माझ्या वडीलांनी चिखली पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केली.

**०३.** दि.२३/०५/२०२६ रोजी अनिल शेलार, युवराज शेलार व सुशील गुप्ता यांनी मला सिमेंटच्या गट्टूने मारहाण केली त्याबाबतची मी चिखली पोलीस स्टेशनला तक्रार दाखल

Bhaladik
1-8-2026

**E-file**

केली आहे. त्या मारहाणीमध्ये माझा दात पडलेला आहे व मला ७० टक्के ऐकायला कमी येवू लागले आहे. आरोपीविरुध्द कठोर शासन व्हावे अशी माझी इच्छा आहे.

**सत्यापन पूर्ण.**

.....................

**साक्षीदाराची सही**

**दि. ०१/०८/२०२६**

**ठिकाण– पिंपरी**

**(टी.एस.महाडीक)**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पिंपरी**